**<u>मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची शुक्रवार दि.१७/४/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.</u>**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२६ वी बैठक शुक्रवार दि.१७.४.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली.सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| २) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ३) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ४) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ५) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ६) | मा. श्री. व्ही.जी.नायर | सदस्य |
| ७) | मा. श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ८) | मा. श्री.शरद शिरिषकर | सदस्य |
| ९) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| १०) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| ११) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १३) | मा.श्री.नंदकुमार काळे | सदस्य |
| १४) | सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १५) | कार्यकारी अभियंता/इमारत प्रस्ताव | निमंत्रक |
| १६) | श्री.पी.पी.महिषी, प्रभारी निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री.महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**<u>बाब क्रमांक : १२६/१</u>**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.१२.०३.२०१० रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते १३ वर सादर करण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी मागील बैठकीत त्यांनी अ.विभागातील श्री. शंकर पार्टे यांचे प्रकरण निदर्शनास आणले होते. त्यांना व्हेकेशन नोटीस देण्यात आली असून ती १९७५ सालची आहे. मुळ इमारतीचे भाडेकरु संक्रमण शिबीरात रहात आहेत बृहतसूची समितीची बैठकीस सुनावणीसाठी त्यांना बोलाविण्यात आले होते व सुनावणीत त्यांनी सर्व

कागदपत्रे जमा केली आहेत असे नमूद करण्यात आले आहे. बृहतसूची समितीच्या अहवालात असे म्हटले आहे की, मुळ इमारतीच्या जागी पाच मजल्याची अनधिकृत इमारत बांधण्यात आली आहे त्या इमारतीतील गाळयाचा ताबा त्यांनी त्यांना देण्यात आलेल्या व्हेकेशन नोटीसच्या आधारे स्वतःहून घ्यावयास हवा होता. व व्हेकेशन नोटीसची पडताळणी करणे शक्य नसून अर्जदारास पात्र करुन बृहतसूचीवरुन वितरण देणे योग्य होणार नाही सबब अर्जदाराची विनंती नामंजूर करण्यात येऊन प्रकरण बंद करण्यात येत आहे. यावर श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता यांनी खुलासा केला की, मागील बैठकीत हा विषय आल्यानंतर प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात आली. जागेवर जी अनधिकृत इमारत बांधण्यात आली आहे ती सन १९९०-९१ मध्ये बांधण्यात आली असून मुंबई महानगरपालिकेने सदर इमारत तोडण्याचा प्रयत्न केला होत व इमारतीचा काही भाग पाडला देखील होता. परंतु तो पुन्हा बांधण्यात आला. एम.आर.टी.पी.ॲक्टखाली पालिकेची कारवाई चालू आहे. सदर अनधिकृत इमारतीतील अनधिकृत व्यक्तींनी त्यांना नियमित करण्यासाठी महानगरपालिकेविरुध्द न्यायालयात दावा दाखल केला आहे. सदर न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे. जे मुळ भाडेकरु संक्रमण शिबीरात आहेत त्यांना इमारत जागेवर उभी असल्यामुळे प्रमाणित करता येत नाही .

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी सदर अनधिकृत इमारत १९९०-९१ मध्ये बांधण्यात येत होती त्याचवेळी मुं.इ.दु. व पु.मंडळाने महानगरपालिकेस का कळविले नाही?. न्यायालयाकडून स्थगिती का मिळविली नाही ? अशी विचारणा करुन का कारवाई केली नाही असा प्रश्न उपस्थित केला. अशाप्रकारे दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कारवाई झाली पाहिजे अशी सूचना केली. यावर श्री. लोहकरे, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, या प्रकरणाबाबत सन २००१ मध्ये तत्कालिन मा. उपाध्यक्ष/प्रा. यांनी आयुक्त,मुंबई महानगरपालिका यांच्याकडे अहवाल पाठविल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने सदर इमारत अनधिकृत जाहीर करुन तोडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मुळ इमारतीतील काही मुळ भाडेकरुंना बृहतसूचीनुसार गाळे वाटप करण्यात आले आहे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी प्रचलित मार्गदर्शक तत्वांनुसार सदर मुळ भाडेकरुंना बृहतसूचीवर घेता येणार नसले तरी अनधिकृत इमारतीबाबत सुरु असलेली कार्यवाही लक्षात घेता व मुळ भाडेकरुंवर अन्याय होऊ नये म्हणून सदर मुळ भाडेकरुंना बृहतसूचीवर घेऊन गाळे वितरण करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करुन शासनाची मान्यता घ्यावी लागेल. मा. सदस्यांनी मा. मुख्य अधिकारी यांनी सुचविलेल्या सदर पर्यायाप्रमाणे कार्यवाही करण्यास सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री.हरिष सणस यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, ना.ह.प्र.प्रस्तावामध्ये काही अटी व शर्तीच्या अधीन राहून मंडळाची मान्यता घेण्यात येते. तरी यापुढे प्रस्ताव परिपूर्ण

असल्याची खात्री करुनच ना.ह.प्र. प्रस्ताव मंडळापुढे सादर करावेत जेणेकरुन ना.ह.प्र.देण्यास विलंब होणार नाही. या मताशी सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली.

मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी मागील बैठकीत मंडळाच्या पुनर्रचित इमारतींचा लिकेज, खराब गटारे, पाण्याचा पाईप तुटला असल्यास किंवा अन्य काही तक्रारी आल्यास इत्यादीबाबत त्वरित कामे करण्याबाबत सूचना केली. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, इमारत अचानक कोसळल्यानंतर तांतडीने रहिवाशांना हलविण्याची गरज असते. त्यासाठी कम्युनिटी हॉल उपलब्ध असावा व त्यामध्ये संडास,बाथरुमची सुविधा असावी व साधारणपणे सुमारे ५० ते ६० कुटुंबे राहतील एवढा मोठा कम्युनिटी हॉल उपलबध असावा अशी सूचना केली होती त्या सूचनेचा विचार व्हावा अशी विनंती केली. तसेच मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी उमरखाडी येथील साईकृपा या पुनर्रचित इमारतीतील रहिवाशांकडून भाडे वसुल करण्यासाठी भाडेवसुलीकार जात नाही. रहिवाशी भाडे भरण्यास तयार असतात. तरी देखील त्या भाडेकरुंना दंड आकारण्यात आला आहे हे बरोबर नाही. मंडळाचा भाडेवसुलीकार गेला असता तर रहिवाशांचे भाडे थकित राहिले नसते. त्यामुळे अशा प्रकरणात दंड आकारण्यात येऊ नये अशी सूचना केली होती त्याचाही विचार व्हावा संक्रमण शिबीरातील गाळयात राहणा-या रहिवाशांची माहिती फलकावर लावण्याबाबत, बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबत, कलम ३३(७) खाली ना हरकत प्रमाणपत्राव्दारे पुनर्विकसित झालेल्या इमारतीतील अतिरिक्त गाळे बृहतसूचीवरील गाळेधारकांना वितरीत करण्याबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. त्या सूचनांवर कार्यवाही करुन सदर मुद्दे संपुष्टात आणावेत अशी सूचना केली. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, मा. सदस्य श्री. बांदिवडेकर यांनी पुनर्रचित इमारतीत कमिटी, संस्था किंवा ग्रामस्थ मंडळाला गाळे वाटप करण्याबाबत काय मार्गदर्शक तत्वे आहेत का ? अशी विचारणा केली होती त्याबाबत माहिती देण्यात यावी अशी सूचना केली

. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, एका रहिवाशाच्या नांवे बाजूबाजूचे दोन गाळे असल्यास त्यांचे एकूण क्षेत्रफळ विचारात घेऊन एकच गाळा दिला जातो परंतु असे गाळे बाजूबाजूला नसतील व वेगवेगळया ठिकाणी असतील तर दोन वेगवेगळे गाळे दिले जातात. हया बाबत मार्गदर्शक तत्वे शासनाच्या विचाराधीन असून याबाबत शासन निर्णय लवकरच अपेक्षित आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी एकूण किती उपकरप्राप्त इमारती आहेत,किती इमारती धोकादायक आहेत, त्यापैकी किती दुरुस्त झाल्या, किती पुनर्विकसित झाल्या याची सविस्तर माहितीची सी.डी.मा.सदस्यांना देण्यात येणार होती त्याबाबत काय झाले अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी पुनर्रचित व पुनर्विकसित होणा-या इमारतींची माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल असे सांगितले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी नवीन स्वरुपात व्हेकेशन नोटीस तयार करण्यात येणार होत्या त्याबाबत काय झाले? अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी संबंधित बाबतीत सहमुख्य अधिकारी यांनी व्हेकेशन नोटीसमधील मसुदा तपासून तसेच बारकोडसारखी उपाययोजना करता येईल का जेणेकरुन त्या व्हेकेशन नोटीसचा दुरुपयोग टाळता येईल व नमुना अंतिम करुन पुढील बैठकीत सादर करावा अशा सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी अशी तक्रार केली की, तांबेकर स्ट्रीट / ईस्त्राईल मोहल्ला या इमारतीचे प्रॉपिंगचे काम सुरु असून प्रॉपिंगसाठी जे साहित्य वापरले आहे ते निकृष्ट दर्जाचे आहे. मुंडे एवढे बारिक आहेत की इमारतीचा भार पेलणार नाही. तसेच ज्या आमदारांच्या निधीमधून कामे केली जातात त्याबाबतच्या माहितीचे फलक लावले जात नाहीत. सहा सहा महिने काम केले जात नाही. मंडळाचे कार्यकारी अभियंता काय करतात ? याची माहिती मा. मुख्य अधिकारी यांनी घ्यावी.

मा. मुख्य अधिकारी यांनी श्री.सिध्दीकी का.अ. व उपमुख्य अभियंता यांना सूचना दिल्या की, मा. सदस्यांनी लक्षात आणून दिल्याप्रमाणे जेथे प्रॉपिंगचे साहित्य चांगले वापरण्यात आले नसेल तर ते संबंधित ठेकेदाराकडून काढून दुसरे चांगले साहित्य वापरावे. व जी कामे करण्यात येत आहेत ती योग्य प्रकारे करण्यात येत आहेत की नाही त्यावर लक्ष ठेऊन पाठपुरावा करावा. श्री.सिध्दीकी का.अ. यानी माहिती दिली की, १०३-१०५, तांबेकर स्ट्रीट या इमारतीचा मालक काम चालू करु देत नव्हता. म्हणून ८ महिने काम बंद होते. आता भाडेकरुंच्या विनंतीनुसार वास्तुशास्त्रज्ञ बदलण्यात आला असून काम सुरु झाले आहे व तेथे फलक लावण्यात येईल.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अपाघातग्रस्तांना रु.२५ लाखांची मदत करण्यासाठी जी तरतूद केली होती व धोरण ठरविले होते त्याबाबत विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, सदर विषय प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

पान क्र.२६ वरील शेवटच्या परिच्छेदामध्ये मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी डिझॅस्टर मॅनेजमेंट बाबतचे पुस्तक अपडेट करुन त्याची प्रत देण्याची सूचना केली होती. त्यावर सचिव यांनी डिझॅस्टर मॅनेजमेंटचे पुस्तक अपडेट करण्याचे काम चालू आहे, व पुढील बैठकीत पुस्तक देण्यात येईल असे सांगितले .

मा.श्री.हेमेंद्र शहा, सदस्य यांनी गाळे विक्रीबाबत जो ठराव झाला होता त्याबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, " प्रथम येईल त्यास प्रथम गाळा " या तत्वानुसार गाळे विक्री योजनेचा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत मंजूर करुन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी पाठविला होता. व प्राधिकरणानेदेखील सदर प्रस्ताव मंजूर केला होता. परंतु " प्रथम येईल त्यास प्रथम गाळा " या तत्वानुसार गाळे विक्री योजना राबविणे शक्य नव्हते म्हणून पूर्वीच्या प्रस्तावात सुधारणा करुन सोडत पध्दतीनुसार गाळे विक्री योजना राबविण्याचा सुधारित प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेनंतर

५

प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला असून प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत सदर प्रस्तावास मंजूरी मिळणे अपेक्षित आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करण्याची नोंद घेऊन कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

------------------------------------oo------------------------------------

**बाब क्रमांक १२६/ २**

विषय- मुंबई बेटावरील अ.वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पूनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

--------------------------------------------------------

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १५ ते ३३, ७९ ते १०७ व १३१ ते १३५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव यांनी खालील १८ पुनर्विकासाच्या विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) च्या प्रस्तावांबद्दल मंडळाच्या सदस्यांना थोडक्यात माहिती दिली.

चर्चेअंती मंजूरीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रकरणी ना.ह.प्र.प्रदान करण्याच्या प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.३७७/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.४५६, दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.७, महिलाश्रम मार्ग, माटुंगा, मुंबई-१९ "**अन्नपुर्णा भवन**" (फ-उत्तर विभाग).
२. अंतिम भुखंड क्र.४६०-टी.पी.एस.३- माहिम विभाग, इ.क्र.२३५-अे/१३-अे व १३-बी, पीतांबर लेन, माहीम, मुंबई-१६, '**नवगीरी हाऊस**' (ग-उत्तर).
३. भुकर पहाणी क्र.१८२२ - माहिम विभाग, प्लॉट क्र.११२ - शिवाजीपार्क स्कीम, इ.क्र.७३२-सी, डॉ.एम.बी.राउत रोड, दादर (प), मुंबई-४०००२८ "**आनंद बील्डींग**" (ग-उत्तर).
४. भुकर पहाणी क्र.११५/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.११६, दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.५७ व १३, १३बी, लखमसी नप्पु रोड व हिंदु कॉलनी रोड क्र.५, दादर (पु), मुंबई-१४ "**समृद्धी को.ऑप.हौ.सो.**" (फ-उत्तर विभाग).
५. भुकर पहाणी क्र.१/१८६१, भायखळा विभाग, इ.क्र.८०-८२ए, मौलाना आजाद रोड, मुंबई येथील "**सुपारीवाला बिल्डींग**" (ई विभाग).
६. भुकर पहाणी क्र.७०४/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५८२-दादर- माटुंगा इस्टेट, इ.क्र.६७ जामे जमशेड रोड, माटुंगा, मुंबई-१९. '**माटुंगा कमल कुंज को-ऑ.सो.लि.' फ-उत्तर.**
७. अंतिम भुखंड क्र.५५०, ५४८, ५४६ टी.पी.एस.४ - माहिम विभाग, इ.क्र.१६७-अे, १७१-बी, १७१-सी-१७१-अे, १७१ ई, १६९-१६९अे-१७१-१७१अे, १७५-डी, १७५-बी, १७९-अे, १७५-अे, ८४५, १७३, १०१६, १०१५-अे, १०१५-अे-अे, १०१५, ग-उत्तर, भवानी शंकर रोड, दादर (प), मुंबई-४०००२८ '**सीद्धी चाळ', 'सीताराम भागोजी चाळ' व 'अमृत मल्लाजी चाळ'.**
८. भुकर पहाणी क्र.८६८, भायखळा विभाग, इ.क्र.१५, कामाठीपुरा ४थी गल्ली, मुंबई-४००००८ **ई-विभाग.**

९ भुकर पहाणी क्र.८९७, भायखळा विभाग, इ.क्र.५०, ३रा कामाठीपुरा, मुंबई-४००००८ **ई-विभाग.**

१० भुकर पहाणी क्र.१७७५, भायखळा, इ.क्र.१५, ३री क्रॉस लेन, सांखळी स्ट्रिट मुंबई येथील **"रतलामवाला बिल्डिंग" ई-विभाग.**

११ भुकर पहाणी क्र.८९८, भायखळा विभाग, उपकर क्र. ई-१२१९ इ.क्र.४८, कामाठीपुरा, ३री गल्ली, मुंबई-४००००८ ई-विभाग.

१२ भुकर पहाणी क्र.१४९८, मांडवी विभाग इ.क्र.१७-१९, न्यु बंगालीपुरा स्ट्रिट, **ब-विभाग.**

१३ अंतिम भुखंड क्र.३८६, टी.पी.एस.४, माहिम विभाग इ.क्र.३९, गोखले रोड, दादर (प) **ग-उत्तर.**

१४ भुकर पहाणी क्र.९९० गिरगांव विभाग, इमारत क्र. २४३-ई, २४३-डी, २४३-सी, २४३-बी, २४३-जी, २४३-एफ, २३३-२६१, पठ्ठे बापुराव मार्ग, फॉकलन्ड रोड, मुंबई-७ "**खेमराज मॅन्शन**".

१५ भुकर पहाणी क्र.८४० मांडवी विभाग, फायनल प्लॉट क्र. २०६ टि. पी. एस. क्र. १ इ.क्र. २२६-२२८ सॅम्युअल स्ट्रिट, मुंबई-४०० ००९ येथील **बंदुकवाला बिल्डिंग**.

१६ भुकर पहाणी क्र.२०८, गिरगाव विभाग, इ.क्र.१२२-१३८, शुक्लाजी स्ट्रिट, मुंबई येथील **कूरेशी इस्टेट**.

१७ भुकर पहाणी क्र.७४४, भायखळा विभाग, इ.क्र.५८, कामाठीपुरा, ५वी गल्ली, मुंबई-४०००0८.

१८ भुकर पहाणी क्र.११५ व १/११५ माझगाव विभाग, इ.क्र.२९अे-२९डी, ११२-१२४ व १२६-१३२, नेस्बीट रोड व सेंट मेरीझ रोड.

<u>ठराव क्रमांक : १२६ /</u>७०६६

मुंबई बेटावरील खालील १८ मालमत्तांवरील 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. तसेच सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

१ भुकर पहाणी क्र.३७७/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.४५६, दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.७, महिलाश्रम मार्ग, माटुंगा, मुंबई-१९ "**अन्नपुर्णा भवन**" (फ-उत्तर विभाग).

२ अंतिम भुखंड क्र.४६०-टी.पी.एस.३- माहिम विभाग, इ.क्र.२३५-अे/१३-अे व १३-बी, पीतांबर लेन, माहीम, मुंबई-१६, '**नवगीरी हाऊस**' (ग-उत्तर).

३ भुकर पहाणी क्र.१८२२ - माहिम विभाग, प्लॉट क्र.११२ - शिवाजीपार्क स्कीम, इ.क्र.७३२-सी, डॉ.एम.बी.राउत रोड, दादर (प), मुंबई-४०००२८ "**आनंद बील्डींग**" (ग-उत्तर).

४ भुकर पहाणी क्र.११५/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.११६, दादर-माटुंगा इस्टेट, इमारत क्र.५७ व १३, १३बी, लखमसी नप्पु रोड व हिंदु कॉलनी रोड क्र.५, दादर (पु), मुंबई-१४ "**समृद्धी को.ऑप.हौ.सो.**" (फ-उत्तर विभाग).

५ भुकर पहाणी क्र.१/१८६१, भायखाळा विभाग, इ.क्र.८०-८२ए, मौलाना आजाद रोड, मुंबई येथील "**सुपारीवाला बिल्डींग**" (ई विभाग).

६ भुकर पहाणी क्र.७०४/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.५८२-दादर- माटुंगा इस्टेट, इ.क्र.६७ जामे जमशेड रोड, माटुंगा, मुंबई-१९. **'माटुंगा कमल कुंज को-ऑ.सो.लि.' फ-उत्तर**.

७ अंतिम भुखंड क्र.५५०, ५४८, ५४६ टी.पी.एस.४ - माहिम विभाग, इ.क्र.१६७-अे, १७१-बी, १७१-सी-१७१-अे, १७१ ई, १६९-१६९अे-१७१-१७१अे, १७५-डी, १७५-बी, १७९-अे, १७५-अे, ८४५, १७३, १०१६, १०१५-अे, १०१५-अे-अे, १०१५, ग-उत्तर, भवानी शंकर रोड, दादर (प), मुंबई-४०००२८ **'सीद्धी चाळ', 'सीताराम भागोजी चाळ' व 'अमृत मल्लाजी चाळ'.**

८ भुकर पहाणी क्र.८६८, भायखळा विभाग, इ.क्र.१५, कामाठीपुरा ४थी गल्ली, मुंबई-४००००८ **ई-विभाग.**

९ भुकर पहाणी क्र.८९७, भायखळा विभाग, इ.क्र.५०, ३रा कामाठीपुरा, मुंबई-४००००८ **ई-विभाग.**

१० भुकर पहाणी क्र.१७७५, भायखळा, इ.क्र.१५, ३री क्रॉस लेन, सांखळी स्ट्रिट मुंबई येथील **"रतलामवाला बिल्डिंग" ई-विभाग.**

११ भुकर पहाणी क्र.८९८, भायखळा विभाग, उपकर क्र. ई-१२१९ इ.क्र.४८, कामाठीपुरा, ३री गल्ली, मुंबई-४००००८ ई-विभाग.

१२ भुकर पहाणी क्र.१४९८, मांडवी विभाग इ.क्र.१७-१९, न्यु बंगालीपुरा स्ट्रिट, **ब-विभाग.**

१३ अंतिम भुखंड क्र.३८६, टी.पी.एस.४, माहिम विभाग इ.क्र.३९, गोखले रोड, दादर (प) ग-उत्तर.

१४ भुकर पहाणी क्र.९९० गिरगांव विभाग, इमारत क्र. २४३-ई, २४३-डी, २४३-सी, २४३-बी, २४३-जी, २४३-एफ, २३३-२६१, पठ्ठे बापुराव मार्ग, फॉकलन्ड रोड, मुंबई-७ **"खेमराज मॅन्शन"**.

१५ भुकर पहाणी क्र.८४० मांडवी विभाग, फायनल प्लॉट क्र. २०६ टि. पी. एस. क्र. १ इ.क्र. २२६-२२८ सॅम्युअल स्ट्रिट, मुंबई-४०० ००९ येथील **बंदुकवाला बिल्डिंग.**

१६ भुकर पहाणी क्र.२०८, गिरगाव विभाग, इ.क्र.१२२-१३८, शुक्लाजी स्ट्रिट, मुंबई येथील **कूरेशी इस्टेट.**

१७ भुकर पहाणी क्र.७४४, भायखळा विभाग, इ.क्र.५८, कामाठीपुरा, ५वी गल्ली, मुंबई-४००००८.

१८ भुकर पहाणी क्र.११५ व १/११५ माझगाव विभाग, इ.क्र.२९अे-२९डी, ११२-१२४ व १२६-१३२, नेस्बीट रोड व सेंट मेरीझ रोड.

**बाब क्रमांक १२६/३ (१)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-१ मधील** (अे, बी, सी-१, सी-२, सी-३) ४८ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.३५ ते ४५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती परिमंडळ-१ः मधील अे, बी, सी-१, सी-२, सी-३ या विभागातील ४८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. ८,३५,६१,७८१/- व निव्वळ रक्कम रु. ४,३६,२९,५११/- प्रदान

करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२६ / १०६७**

परिमंडळ-१ः मधील अे, बी, सी-१, सी-२, सी-३ या विभागातील ४८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. ८,३५,६१,७८१/- व निव्वळ रक्कम रु. ४,३६,२९,५११/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२६/३ (२)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) या विभागातील २९ इमारती.

.................................

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.४७ ते ५३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती **परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) या विभागातील २९ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.७,२५,७२,४३२/- व निव्वळ रक्कम रु. ३,८९,१३,८५०/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२६ / १०६८**

**परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, ग-दक्षिण) या विभागातील २९ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. ७,२५,७२,४३२/- व निव्वळ रक्कम रु. ३,८९,१३,८५० /- प्रदान

करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२६/३ (३)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) विभागातील ४८ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.५५ ते ६३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

**परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) ४८ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. १२,४३,२७,७१०/- व निव्वळ रक्कम रु.४,८६,५८,३६८/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२६ / १०६९**

**परिमंडळ-३ मधील** (ई-१, ई-२, फ-दक्षिण) ४८ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करून प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.. १२,४३,२७,७१०/- व निव्वळ रक्कम रु. ४,८६,५८,३६८/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२६/३ (४)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) २१ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.६५ ते ६९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती **परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) या विभागातील २१ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,२८,३९,०२१/- व निव्वळ रक्कम रु..२,१९,५५,०७७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२६ / १०७०**

**परिमंडळ-४ मधील** (फ-उत्तर व ग-उत्तर) २१ उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.३,२८,३९,०२१/- व निव्वळ रक्कम रु..२,१९,५५,०७७/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

मा. उपसभापती तसेच बैठकीचे अध्यक्ष यांना उच्चाधिकार समितीमध्ये बोलाविण्यात आल्यामुळे मा. सदस्यांची परवानगी घेऊन मा. उपसभापती उच्चाधिकार समितीकरिता गेले. त्यानंतर मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी वरिष्ठ सदस्य श्री. हेमराज शहा यांना अध्यक्ष स्थान भुषविण्याची सूचना केली. व त्यास मा. सदस्य श्री.हरिष सणस यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार सर्व मा. सदस्यांच्या सहमतीने पुढील होणा-या बैठकीचे अध्यक्ष स्थान भुषविले.

**बाब क्रमांक १२६/३ (५)**

विषय- उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

---

**परिमंडळ-१ मधील** (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) विभागातील ५४ इमारती..

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१३७ ते १५३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

99

चर्चेअंती परिमंडळ-१ मधील (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) या विभागातील ५४ इमारती उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु.८,८४,३९,०९०./- व निव्वळ रक्कम रु..६,४३,३५,७८९/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**ठराव क्रमांक :१२६ / १०७१**

**परिमंडळ-१ मधील** (अ, ब, सी-१, सी-२, सी-३) विभागातील ५४ इमारती उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामांच्या मुळ / सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकास उपमुख्य अभियंता यांनी निधीची उपलब्धतता (अंदाजपत्रकीय तरतुद) लक्षात घेऊन व इमारतीची स्थितीवार विगतवारी करुन प्राधान्य क्रमानुसार दुरुस्तीस घेण्याकरिता प्रशासकिय मंजुरी एकूण रक्कम रु. ८,८४,३९०,९०./- व निव्वळ रक्कम रु..६,४३,३५,७८९/- प्रदान करण्याच्या प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२६ / ४**

विषय- इ.क्र.१५८-ई-१५८-जी, अलीभाई प्रेमजी मार्ग परिमंडळ-२ मधील इमारतीच्या दुरुस्तीच्या कामास मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस रु.२०००/- चौ.मी. प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या अधिन राहून मंजूरी मिळण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **७१** ते **७५** वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक :१२६ /१०७२**

इ.क्र.१५८-ई-१५८-जी, अलीभाई प्रेमजी मार्ग परिमंडळ-२ मधील इमारतीच्या दुरुस्तीच्या कामास मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यतेवरील रक्कमेस रु.२०००/- चौ. मी.प्रचलित प्रमाणित मर्यादेच्या अधिन राहून प्रस्तावास मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**<u>बाब क्रमांक </u>१२६.५**

विषय- परिमंडळ-४ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ७७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक :१२६ /१०७३</u>**

परिमंडळ-४ मधील फ-उत्तर विभागातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास रु.२,०५,५७३/- या रक्कमेस प्रशासकिय मंजुरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

मा. उपसभापती पुन्हा बैठकीत हजर होऊन त्यांनी बैठकीचे अध्यक्ष स्थान पुन्हा स्विकारले.

**<u>बाब क्रमांक </u>१२६.६**

विषय- इ.क्र.३६-एल, मुगभाट क्रॉस लेन, म्हाड अधिनियम क्र.८८(३)(अ) अन्वये जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करणे.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**<u>ठराव क्रमांक :१२६ /१०७४</u>**

इ.क्र.३६-एल, मुगभाट क्रॉस लेन, म्हाड अधिनियम क्र.८८(३)(अ) अन्वये जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

**बाब क्रमांक १२६.७**

विषय- नावात बदल करणे बाबत (ना ह. प्र.).
भूकर पहाणी क्र.७१०, ७११ आणि ७१२ गिरगाव विभाग, इ.क्र.८१-८३ मणी भवन, पारसीवाडा आणि परमार बिल्डिंग.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. १५७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक :१२६ /१०७५**

भूकर पहाणी क्र.७१०, ७११ आणि ७१२ गिरगाव विभाग, इ.क्र.८१-८३ मणी भवन, पारसीवाडा आणि परमार बिल्डिंग. नावात बदल करणे बाबत (ना ह. प्र.). च्या प्रस्तावास मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

---

मा.श्री.सुबोध बांदिवडेकर, सदस्य यांनी अशी सूचना केली की, इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी रहिवाशांनी १०३-ब कलमांतर्गत ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या आहेत. सदर संस्थांची स्थापना ही घाईगडबडीने व अर्धवट माहितीच्या आधारे बनविल्या गेल्या आहेत. आज त्या संस्थांची अशी अवस्था आहे की, इमारतीची मोडकळीस आलेल्या आहेत व दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक निधी रहिवाशांकडे नाही व सहकारी संस्था असल्यामुळे लोकप्रतिनिधींना अशा इमारतींकरिता निधी वापरता येत नाही. अशा इमारतींसाठी मंडळातर्फे विशेष निधी देता येईल का ? अशी विचारणा केली. यावर श्री. महिषी, सचिव यांनी खुलासा केला की, १०३-ब कलमांतर्गत मालमत्ता सहकारी गृहनिर्माण संस्थांकडे हस्तांतरित झालेली असते. त्यामुळे सदर इमारत डिसेस होते व तिची संपूर्ण जबाबदारी संस्थेवर असते. १०३-ब च्या अनुषंगाने प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

मा. श्री. गजेंद्र लष्करी, सदस्य यांनी निदर्शनास आणले की, रा.गां.नि.प्रकल्पातील ओमकार इमारतीतील रहिवाशी श्री. विजय म्हात्रे यानी आपल्या आईच्या नावावरील गाळा स्वतःच्या नांवे करण्यासाठी मंडळाकडे रितसर अर्ज केला आहे. गाळा नावावर करण्यासाठी आईने व त्याच्या भावांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे असे असतानासुध्दा त्यांना रु.४०,२६४/- शुल्क आकारण्यात आले. एवढी रक्कम त्यांना भरणे शक्य होणार नसून गाळे हस्तांतरणासाठी आकारण्यात येणार शुल्क त्यांना आकारण्यात यावे अशी त्यांची विनंती आहे.

126

मा. सदस्यांनी रक्ताचे नाते असल्याने गाळे हस्तांतरणासाठी आकारण्यात येणार शुल्क का आकारण्यात येत नाही अशी विचारणा केली. यावर उपमुख्य अधिकारी(पु.गा.) यांनी खुलासा केला की, आई वडील हयात नसतील गाळे हस्तातरण वारसांच्या नावे करण्यासाठी रु.२०००/- शुल्क आकारण्यात येते व आई वडीलांच्या हयातीत जर गाळा नावावर करावयाचा झाल्यास नियमितीकरणाचे शुल्क आकारण्यात येते.

मा. श्री. गजेंद्र लष्करी, सदस्य यांनी अशी सूचना केली की, रा.गां.नि.प्रकल्पाच्या इमारतींची पुनर्बांधणी खाजगी विकास, म्हाडा व भाडेकरु/रहिवाशी यांच्या भागीदारीतून करण्याचा एक पायलेट प्रोजेक्ट तयार करण्यात यावा. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, कलम ३३(७) अंतर्गत जॉईंट व्हेंचरचे धोरण विचाराधीन असून ते अंतिम टप्प्यात आहे. सदर धोरण अंतिम झाल्यानंतर अनेक प्रकल्प त्या धोरणानुसार राबविता येणार आहेत. परंतु तोपर्यंत आपणास थांबावे लागेल.

मा. श्री. हरिष सणस, सदस्य यांनी अमरनाथ भवन इमारतीचे एक रहिवाशी श्री. अशोक पडवळ यांनी गाळा त्यांच्या नांवे करण्यासाठी आवश्यक त्या पुराव्यांसह अर्ज केला असता मंडळाच्या कार्यालयाकडून श्री. पडवळ त्यांना पाठविण्यात आलेल्या पत्राात त्यांनी आवश्यक पुरावे सादर केले नसल्याचे कळविले आहे तसेच त्याच पत्रात पुरावे सादर केल्याचाही उल्लेख आहे. अशाप्रकारे पुरावे असूनही पुरावे सादर केलेले नाहीत असे कळविण्यात आले आहे याचा अर्थ काय समजावा अशी विचारणा केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी मा. सदस्यांनी सदर पत्र तपासून निर्णय घेण्यात येईल असे सांगितले.

मा. श्री. हरिष सणस, सदस्य यांनी कुर्ला येथे विनोबा भावे नगर संक्रमण शिबीरातील संक्रमण गाळे तोडण्यात येत आहेत. तेथे कशाप्रकारची योजना राबविण्यात येत आहे ? अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, विनोबा भावे नगर संक्रमण शिबीर येथे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून विकसित करण्यात येत आहे. आपल्या मंडळाकडून पात्र लोकांना अन्य संक्रमण शिबीरात स्थलांतरित करण्यात येत आहे व घुसखोर लोकांना बाहेर काढण्यात येत आहे. सदर संक्रमण शिबीराच्या विकासाच्या अनुषंगाने माहिती मुंबई मंडळाच्या एस.आर.डी.विभागाकडून घेऊन पुढील बैठकीत देण्यात येईल असे सांगितले.

मा. श्री. हरिष सणस, सदस्य यांनी स्वान मिल, कुर्ला येथे गाळे बांधण्यात येत असून त्यांना पाठविलेल्या पत्रात १५९ गाळे मंडळास मिळतील असे कळविले आहे परंतु त्यांच्या माहितीप्रमाणे मिळणा-या गाळयांची संख्या खूप मोठी आहे. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, गिरण्यांच्या जमिनीवरील सुमारे ३००० ते ३५०० गाळे संक्रमण शिबीरासाठी मिळणार आहेत तर याव्यतिरिक्तपुढे गिरण्यांच्या जमिनीवरील मिळणारे गाळे विचारात घेतल्यास सुमारे ६ ते ७ हजार गाळे संक्रमण शिबीराकरिता मिळतील अशी अपेक्षा

आहे. याबाबतची माहिती श्री. मिलिंद पाटील, उपमुख्य अभियंता (स..शि. ) यांनी एस.आर.डी.कडून घेऊन पुढील बैठकीत द्यावी अशा सूचना दिल्या.

सचिव यांनी बाब टिपणी क्र.१२६/२ (१५) मध्ये काही आकडे लिहावयाचे राहून गेले आहेत. तरी सदर बाब टिपणीतील पृ.क्र.१२१ वर " अ.क्र.१५ मध्ये ११९७.७६, अ.क्र.१६ मध्ये ६४५.१८ व अ.क्र.१७ मध्ये ३७२.५९, अ.क्र.१८ मध्ये काही नाही " अशी सुधारणा करण्यात येत असून कृपया त्यांची नोंद घ्यावी अशी वनिंती केली.

बैठकीच्या अखेरीस मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा नि.का.अ.
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी
मुं.इ.दु.व पु.मंडळ